मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# राष्ट्रहित, सामाजिक भान जपणे हाच जीवनाचा पाया!

## माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे मत : 'फेस ऑफ इन्स्पिरेशन-2024' पुरस्कारांचे वितरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारत ही छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकोबाराय यांची भूमि आहे. तुकोबांचे कीर्तन ऐकण्यासाठी शिवराय भंडारा डोंगरावर येत असत. ही शिवरायांची, शूरवीरांची पुण्यभूमी आहे. राष्ट्रहित आणि सामाजिक भान जपणे हा जीवनाचा पाया आहे. पांडुरंग प्रत्येकाच्या मनामनात आहे. लोकसेवा करण्याची प्रेरणा त्याच्याकडूनच मिळते, अशा भावना माजी सनदी अधिकारी व चाणक्य मंडलचे सर्वेसर्वा प्रा. अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केल्या. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे एक्सप्रेस मीडिया एंटरप्राईझेस, पुणे यांच्या वतीने 'फेस ऑफ इन्स्पिरेशन-२०२४' पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रा. धर्माधिकारी बोलत होते.

कार्यक्रमासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे, मराठी सिने अभिनेता अंकुश चौधरी, कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक कुमार प्रॉपर्टीज लाईफस्पेस चे व्यवस्थापकीय संचालक अमेय इंद्रकुमार जैन, राष्ट्रवादी महिला काँग्रेस शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट, पिंपरी-चिंचवड सराफ असोसिएशनचे अध्यक्ष रमेश सोनिगरा, महाराष्ट्र राज्य विद्युत सानियंत्रण समिती जिल्हा सदस्य संतोष सौंदणकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मानयवर उपस्थित होते.

पद्मश्री गिरीष प्रभुणे म्हणाले की, भारत देश आता अमृत महोत्सवी वाटचाल करीत आहे. गेल्या १० वर्षांत देशाने अनेक क्षेत्रात यशस्वी कामगिरी केली आहे. या भारत देशाचे नागरिक म्हणून आपण प्रत्येकाने भारतमातेची सेवा करण्याची प्रेरणा घेतली पाहिजे. अभिनेता अंकुश चौधरी म्हणाले की, ज्यांच्या कार्यामुळे समाजाला प्रेरणा मिळते. त्यांचा गौरव करण्याची संधी मला मिळाली, ही बाब माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. मुंबईतील नाट्यगृहापेक्षा पिंपरी-चिंचवडमधील नाट्यगृह सुसज्ज आहेत, ही बाबही त्यांनी अधोरेखित केली. तसेच, प्रा. रामकृष्ण प्रेक्षागृहात सादर केलेल्या नाटकांच्या आठवणीही त्यांनी सांगितल्या. कार्यक्रमाचे आयोजन एक्सप्रेस मीडिया एंटरप्राईझेसच्या संचालिका व न्यूज एक्सप्रेस मराठीच्या संपादिका मनिषा थोरात-पिसाळ यांनी केले. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले. सुमारे आठशे प्रेक्षकांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अधिकराव दिवे-पाटील यांनी केले. सूत्रसंचालन शुभांगी शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन संस्थेचे मार्गदर्शक संतोष सौंदणकर यांनी आणि व्यवस्थापन विलास देशमुख यांनी केले.





### विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव...

» ह.भ.प. श्री.धोंडीबा बाळाजी आल्हाट, महावितरण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार,मानसोपचारतज्ज्ञ डॉ. धनंजय अष्टुरकर, संस्कार प्रतिष्ठान, ज्येष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर, फिजिशियन डॉ.भाग्यश्री लहाणे-मुंडे उद्योजिका वंदना चौव्हाण, अ‍ॅड. माधवी बाळपोतदार, अ‍ॅड. सारिका परदेशी, लघु उद्योजक संघटनेचे संदीप बेलसरे, फाळके न्युरो हॉस्पिटल, गायकवाड डायबीटीज हॉस्पिटल, वास्तुकला तज्ञ माणिक बुचडे, नेक्सास ग्रुपचे नरेशकुमार पटेल आणि ग्रुप, रिव्हर नेस्टचे दादाराव जाधव आणि नरेश बर्गे, वरीष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंखे, अभिनेत्री आर्या घारे, एल-एक्सीस सोसायटी, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड कम्पुटर स्टडिज, निसर्ग राजा मैत्र जिवांचे, मेजर उदय जरांडे, नेत्रतज्ज्ञ डॉ. मयूर जावळे, रोटरी क्लब ऑफ डायनॅमिक, प्रीजम सिटी, केंब्रिज इंटरनॅशन स्कूल, अधिरा इंटरनॅशनल स्कूल, गायत्री इंग्लिश मिडिअम स्कूल, गुरूवर्य अ‍ॅकॅडमी, विकासभाउ साने सोशल फाउंडेशन आदी मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला.















# बेशिस्त वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांचा कारवाईचा बडगा

## वाहतूक नियम तोडणाऱ्या विरुद्ध दिशेने वाहन चालवणाऱ्या 30 हजार 927 चालकांविरुद्ध कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक नियम तोडणाऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. विरुध्द दिशेने वाहन चालवणाऱ्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. हीच बाब लक्षात घेत अशा ३५ हजार बेशिस्त वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

वाहतूक नियम तोडणाऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. विरुध्द दिशेने वाहन चालवणाऱ्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. हीच बाब लक्षात घेत अशा ३५ हजार बेशिस्त वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

पुणे शहरात वाहतूक कोंडीची समस्येमुळे वाहतूक पोलीस त्रासले आहेत. वाहतूक कोंडी सोडवण्यात पोलीस गुंतले असल्याचा फायदा घेत अनेक वाहनचालकांकडून पुणे शहर आणि परिसरात वाहतूक नियमांना केराची टोपली दाखवली जात आहे. बेशिस्त वाहनचालक विरुद्ध दिशेने वाहन चालवत असल्याने गंभीर अपघात घडत आहेत. अशा बेशिस्त वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी तीव्र कारवाईची मोहीम सुरू केली आहे. नोव्हेंबर अखेरपर्यंत ३० हजार ९२७ चालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. 'ट्रिपल सीट' वाहन चालवणाऱ्या तीन हजार ३४१, तर ६३४ मद्यपी चालकांविरुद्ध कारवाई झाली असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी सांगितले.

कारवाई करूनही वाहनचालक सर्रास वाहतूक नियमभंग करत असल्याचे दिसून आले. विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, मोबाइलवर संभाषण, एका दुचाकीवरून तिघांचा प्रवास (ट्रिपल सीट), मद्य पिऊन वाहन चालवणे, मोटार चालवताना आसनपट्टा (सीट बेल्ट) न लावणे अशा प्रकारचे नियमभंग सर्रास केले जातात. बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाईचा, तसेच संबंधिताचे वाहन सहा महिन्यांसाठी जप्त करण्यात येईल, असा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

शहरात बेशिस्त वाहनचालकांमुळे गंभीर स्वरूपाच्या अपघातांचे प्रमाण वाढले आहे. वाहतूक पोलीस दिवसभरात दोन सत्रांत काम करतात. वाहतूक शाखेतील ८५० पोलीस कर्मचारी दोन सत्रांत विविध चौकांत वाहतूक नियमन करतात. वाहनचालकांच्या बेदरकारपणामुळे गंभीर अपघात घडतात. बेशिस्त वाहनचालकांमुळे कोंडीत भर पडते. शहरात दररोज दोन ते तीन गंभीर अपघात घडतात, असे निरीक्षण वाहतूक पोलिसांनी नोंदवले आहे.



### वाहतूक पोलिसांनी नोव्हेंबर महिन्यात केलेली कारवाई

- विरुद्ध दिशेने वाहन चालवणे - ३०,९२७
- एका दुचाकीवरून तिघांचा प्रवास - ३,३४१
- मद्य पिऊन वाहन चालवणे - ६३४

> शहरात बेशिस्त वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांकडून सातत्याने कारवाई केली जात आहे. विरुध्द दिशेने वाहन चालवल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. त्यामुळे बेशिस्त वाहनचालकांवर कडक कारवाई केली जात आहे. मद्य पिऊन वाहन चालवणाऱ्या अडीच हजार जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात ५०० जणांचा वाहतूक परवाना निलंबित करण्याचा प्रस्ताव वाहतूक पोलिसांनी प्रादेशिक परिवहन विभागाकडे पाठवला आहे. संबंधित चालकांचा परवाना किमान सहा महिन्यांपर्यंत निलंबित होणार असल्याने त्यांना वाहन चालवण्यास बंदी असणार आहे.
>
> **- अमोल झेंडे, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा**

# पुरासाठी पाऊस नव्हे महापालिकाच जबाबदार, पूरपरिस्थितीचा अभ्यास करणाऱ्या समितीचा अहवाल आला समोर

## कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आणि पुरामागील नेमकी कारणे समजून घेण्यासाठी महापालिकेने तीन सदस्यीय समिती नेमली होती

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून विसर्ग केल्यानंतर जुलै महिन्यात सिंहगड रस्ता परिसरासह शहरात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. या पूरपरिस्थितीला अनेक कारणे असल्याचे सांगण्यात येत होते. त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आणि पुरामागील नेमकी कारणे समजून घेण्यासाठी महापालिकेने तीन सदस्यीय समिती नेमली होती. या समितीचा अहवाल तब्बल चार महिन्यांनंतर समोर आला आहे. जलसंपदा विभागाच्या खडकवासला विभागाने २०१६ मध्ये निश्चित केलेल्या पूररेषेत पुणे महापालिकेने गुंठेवारीनुसार बांधकामांना परवानगी दिली आहे. तसेच संमती देताना जलसंपदा विभागाने 'ना हरकत' प्रमाणपत्र दिले आहे. यामुळे या परिसरात पूरपरिस्थितीला महापालिका आणि जलसंपदा विभागच जबाबदार असल्याचा आरोप पुणेकरांकडून केला जाऊ लागला आहे.

दरम्यान, जुलै महिन्यातील पूरपरिस्थितीला धरण क्षेत्रात आणि मुक्त पाणलोट क्षेत्रात पडलेला अतिरिक्त पाऊस, तसेच नदीपात्रातील अनधिकृत बांधकामे आणि राडारोडा अशी कारणे जबाबदार असल्याचे निरीक्षण समितीने नोंदवले आहे.

पावसाळ्यात २४ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली. सिंहगड रोड परिसरातील एकतानगर, निंबजनगर, विठ्ठलनगर, पुलाची वाडी या परिसरासोबतच शहरातील अनेक भागातील नागरिकांच्या घरात पाणी घुसले. या परिस्थितीला नदीपात्रात टाकण्यात आलेला राडारोडा तसेच नदीसुधार प्रकल्पाचे काम जबाबदार असल्याचा आरोप करण्यात आला होता. यासोबतच अनेक नव-नवीन कारणे पुढे आणली जात होती.



### इमारतींना महापालिकेची परवानगी

सिंहगड रोडवरील एकतानगर, निंबजनगर भागाची पाहणी केली असता या ठिकाणचा काही भाग ब्लू लाईनमध्ये येत असल्याचे निदर्शनास आले. मुठा नदीलगत असलेल्या या भागात वारजे हायवे ब्रीज ते विठ्ठलवाडी दरम्यान एकूण ९ इमारती पूर्णतः व ११ इमारती अशंतः पूर नियंत्रण रेषेच्या आतमध्ये येत आहेत. पूर नियंत्रण रेषेच्या आत असलेल्या इमारती गुंठेवारीत मान्य करण्यात आलेल्या आहेत. यामधील ६ इमारतींना पुणे महापालिकेने रीतसर संमती दिलेली आहे. धक्कादायक बाब अशी आहे की, संमती देतेवेळी पाटबंधारे विभागाच्या 'ना हरकत; प्रमाणपत्राच्या आधारेच संमतीविषयक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच २४ जुलै रोजी आलेल्या पूरपरिस्थितीनंतर करण्यात आलेल्या सर्वेमध्ये रेड लाईन ते ब्लू लाइनमध्ये एकूण ८३ मिळकती असून ब्लू लाईनमध्ये ३३ मिळकती आहेत. या इमारती गुंठेवारीमध्ये मान्य करण्यात आलेल्या आहेत. तसेच महापालिकेने रितसर संमतीपत्र दिल्याचे आढळून आले आहे.

### ब्लू लाईनच्या आतील नदीचा प्रवाह मोकळा असावा

समितीने पूरपरिस्थिती रोखण्यासाठी काही अल्प मुदतीच्या तर दीर्घकालीन उपाययोजना सुचवल्या आहेत. त्यानुसार नदीलगतच्या रहिवासी भागात ब्लू लाईन आणि रेड लाईन ठळकपणे दर्शवण्यात यावी. सतत पाणी घुसणाऱ्या भागात इशारा यंत्रणा कायमस्वरूपी बसवावी. नदीपात्रात टाकलेला राडारोडा काढून टाकावा, अशा उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत, तर दीर्घकालीन उपाययोजनेमध्ये अतिक्रमणामुळे बिघडलेले नदीचे अस्तित्व पुनर्स्थापित करावे. राडारोडा टाकण्यापासून रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करावी. ब्लू लाईनच्या आतील नदीचा प्रवाह मोकळा असावा. शहरातील नैसर्गिक नाल्यांची पुनर्स्थापना करावी. तसेच नदीपात्रालगत केलेली अतिक्रमणे काढून तिचे पुनर्वसन करावे. पूररेषेच्या आत बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये. पूरक्षेत्रातील बेकायदेशीर बांधकामावर नियंत्रण ठेवावे. राडारोडा टाकण्यापासून रोखण्यासाठी नदीपात्रातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवल्यास २४ तास नियंत्रण ठेवणे शक्य होईल. अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी राडारोडा टाकणाऱ्या व अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे, त्यामुळे अशा बांधकामांवर वचक राहील.

# प्रशासकीय राजवटीत पिंपरीवर झाला अन्याय

## महापालिकेच्या माध्यमातून प्रशासकीय राजवटीत शहरात तब्बल तीन हजार कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या माध्यमातून प्रशासकीय राजवटीत शहरात तब्बल तीन हजार कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत. या कामात शहरातील विकास कामाचा असमतोल साधला गेला आहे. सर्वात जास्त कामे चिंचवडमध्ये, तर सर्वात कमी कामे पिंपरीत झाली आहेत. मात्र, सर्वाधिक खर्चाची कामे भोसरी विधानसभा मतदारसंघात झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. या कालावधीत महापालिका हद्दीत विविध विकास कामांवर पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघांत २,९३४ कोटी १३ लाख ९४ हजार ४३२ रुपये खर्च केले आहेत.

महापालिकेतील राजकीय पदाधिकाऱ्यांचा कालावधी १२ मार्च २०२२ ला संपुष्टात आल्यानंतर प्रशासकीय कालावधी सुरू झाला. प्रशासकीय राजवटीतील तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी फक्त देखरेख व नियोजित कामेच सुरू ठेवली होती. मात्र, त्यांच्या जागी आलेल्या आयुक्त शेखर सिंह यांनी शहरातील मोठ्या प्रकल्पांना हिरवा कंदील देत कोट्यवधी रुपयांची निविदा काढल्या. त्यामुळे शहरात तब्बल तीन हजार कोटीची निधी खर्च होत आहे.

दरम्यान, शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघांतील एकत्रित कामांवर महापालिकेने ६३ कोटी १६ लाख ६६ हजार १५४ रुपये खर्च केले आहेत. क्रीडा आणि उद्यानविषयक कामांमध्ये ११३ कोटी २५ लाख १ हजार ७३६ रुपये खर्च झाले आहेत.



### निविदांची कोटीच्या कोटी उड्डाणे

» महापालिकेकडून नदी सुधार योजनेत मुळा नदीच्या पहिल्या टप्प्यासाठी ३२१ कोटींची निविदा काढण्यात आली. चिंचवडच्या ऑटो क्लस्टरसमोर १८ मजली प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी २८६ कोटी, शहरातील १८ मीटरपेक्षा अधिक रुंदीचे रस्ते यांत्रिक पद्धतीने साफसफाईसाठी ६४७ कोटींची, तर भामा-आसखेड धरणातून पाणी आणण्यासाठी जॅकेवल व पंपिंग स्टेशन बांधण्यासाठी १५१ कोटींची निविदा काढण्यात आली. अर्बन स्ट्रीटच्या कामालाही परवानगी देण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळातही मोठ्या खर्चाच्या निविदा काढण्यात आल्या.

### विधानसभा मतदारसंघानुसार केलेली कामे

- » भोसरी [३८७]- १२२८ कोटी ८३ लाख ९१ हजार १५९
- » चिंचवड [४४२] - ६५४ कोटी ३९ लाख ९९ हजार १०
- » पिंपरी [३३१] - ८९७ कोटी १० लाख ७६ हजार ४७
- » एकत्रित [१७] - ४० कोटी ८४ लाख २६ हजार ४८०
- » एकूण [११७७] - २८२० कोटी ८८ लाख ९२ हजार ६९६

### विधानसभा मतदारसंघानुसार केलेली कामे (उद्यान व क्रीडा)

- » भोसरी [५६] - २८ कोटी ६३ लाख ५४ हजार २७२
- » चिंचवड [६१] - ४५ कोटी ४२ लाख ७ हजार ७१२
- » पिंपरी [३०] - १६ कोटी ८७ लाख ७८
- » एकत्रित [५] - २२ कोटी ३२ लाख ३९ हजार ६७४
- » एकूण [१५२] - ११३ कोटी २५ लाख १ हजार ७३६

# मेट्रो फिडर सेवेला महिनाभरात 42 लाखांचे उत्पन्न; तब्बल 16 मार्गांवर पीएमपीची सुविधा

## मेट्रोच्या प्रवाशांच्या सुविधेसाठी मेट्रोथांब्यांना जोडणारी पीएमपीकडून मेट्रो फिडर सेवा सुरू करण्यात आली होती.

**पिंपरी | प्रतिनिधी**

मेट्रोच्या प्रवाशांच्या सुविधेसाठी मेट्रोथांब्यांना जोडणारी पीएमपीकडून मेट्रो फिडर सेवा सुरू करण्यात आली होती. त्या अनुषंगाने १२ मार्गांवर फिडर सेवा देण्यात आली. वारंवारिता व वेळेचे ताळमेळ नसल्याने ही सेवा गुंडाळावी लागते की काय, अशी शक्यता होती.

मेट्रोच्या प्रवाशांच्या सुविधेसाठी मेट्रोथांब्यांना जोडणारी पीएमपीकडून मेट्रो फिडर सेवा सुरू करण्यात आली होती. त्या अनुषंगाने १२ मार्गांवर फिडर सेवा देण्यात आली. वारंवारिता व वेळेचे ताळमेळ नसल्याने ही सेवा गुंडाळावी लागते की काय, अशी शक्यता होती. मात्र, त्यानंतर पीएमपीच्या वतीने योग्य नियोजन करून तसेच, प्रवाशांच्या सर्वेक्षणानंतर त्या ठिकाणी बससेवा सुरू केल्यानंतर या सेवेला प्रतिसाद मिळू लागला आहे. आता फिडर सेवेत वाढ करून पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात एकूण १६ मार्गांवर 'फिडर' सेवा सुरू आहे. मागील महिनाभरात पीएमपीएलला ४२ लाख ६५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. यामुळे आणखी काही मार्गांवर ही सेवा सुरू करण्याची चाचपणी सुरू आहे.

पिंपरी ते सिव्हिल कोर्ट आणि वनाज ते रामवाडीपर्यंत मेट्रोसेवा सुरू झाली आहे. त्यामुळे नागरिकांचा प्रवास सुखकर झाला आहे. मेट्रो स्टेशन ते घरापर्यंत प्रवास करता यावा म्हणून पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएल) शहरात १२ ठिकाणी फिडर सेवा सुरू केली आहे. पण, त्याचे योग्य नियोजन नसल्याची ओरड करण्यात आली होती. त्यातून बसची वाट पाहात प्रवासी निघून जात होते. या कारणामुळे ही सेवा तोट्यात जाऊ लागली. दरम्यान यानंतर पीएमपी अधिकाऱ्याने या सर्व मार्गांचे सर्वेक्षण केले. त्याचप्रमाणे प्रवाशांच्या गरजा ओळखून त्या ठिकाणी सेवेमध्येदेखील बदल केला. यामधून महिनाभरातच पीएमपीएल मालामाल झाली आहे.

दरम्यान, मेट्रोच्या प्रवासानंतर नागरिकांना बससेवा उपलब्ध नसल्याने खासगी वाहनांचा वापर वाढला होता. मात्र आता हे प्रवासी मेट्रो फिडर वाहनाकडे वळले असल्याचे दिसून येत आहे. कारण या महिनाभरात जवळ सर्वच मार्गांवर मेट्रो फिडर सेवा अविरत सुरू आहे. त्यात कोणताही खंड पडला नाही. त्याचप्रमाणे तब्बल ४२ लाख रुपये उत्पन्नही मिळाले आहे. दरम्यान, प्रत्येक मेट्रो स्थानकावर पीएमपीएल मार्ग आणि सुटणाऱ्या बसेसचा तपशील स्पष्टपणे प्रदर्शित करावा, तसेच फिडर बसमध्ये वाढ करण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.




### या स्थानकावर मेट्रो फिडर सेवा

» स्वारगेट मेट्रो स्टेशन ते स्वारगेट मेट्रो स्टेशन वर्तुळ, शिवाजीनगर मेट्रो स्टेशन ते नरेगाव, धनकवडी ते स्वारगेट मेट्रो स्टेशन भारती विद्यापीठ स्वारगेट मेट्रो स्टेशन, राजस सोसायटी ते स्वारगेट मेट्रो स्टेशन, वनाज कंपनी मेट्रो स्टेशन ते वनाज कंपनी मेट्रो स्टेशन, गणपती माता ते डेक्कन जिमखाना मेट्रो स्टेशन, सिव्हिल कोर्ट मेट्रो स्टेशन ते हडपसर, रामवाडी मेट्रो स्टेशन ते इंटरनॅशनल टेक पार्क खराडी, येरवडा मेट्रो स्टेशन ते लोहगाव विमानतळ. सेक्टर क्र. १२ पीएम आवास योजना भोसरी ते नाशिक फाटा मेट्रो स्टेशन, दिघी ते पिंपरी चौक मेट्रो स्टेशन पिंपरी मेट्रो स्टेशन ते मुक्ताई चौक, पिंपरी मेट्रो स्टेशन ते काळेवाडी फाटा, भक्ती शक्ती ते नाशिक फाटा मेट्रो स्टेशन.

> सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. काही महिन्यांपूर्वी सेवेबाबत सर्वेक्षण केले होते. स्वारगेट स्थानकापासून ५ मार्गांवर फिडर बससेवा सुरू करण्यात आली आहे. मेट्रो फिडरची प्रवासी संख्या अधिक वाढवण्याचे प्रयत्न करणार आहे.
>
> **- सतीश गव्हाणे, मुख्य वाहतूक व्यवस्थापक, पीएमपीएमएल**

# वाहतूककोंडीने वाघोलीत ऐन थंडीत घाम

## रस्त्यावर लावली जातात चारचाकी वाहने, सततच्या कोंडीमुळे सुट्टीत गावाकडे जाण्यासदेखील होत आहे चालढकल

**पुणे | प्रतिनिधी**

वाघोली गावाचा तीन वर्षांपूर्वी पालिकेत समावेश झाला. पुणे-नगर रस्त्यावरील महत्त्वाचे उपनगर असलेले वाघोलीचे नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून वाहतूक कोंडीच्या प्रश्नामुळे हैराण झाले आहेत. परिस्थितीनुसार अनेक ठिकाणी दुचाकी वाहनांची जागा चारचाकी वाहनांनी घेतली आहे. वाघोली परिसरामध्ये चारचाकी वाहनांच्या झालेल्या वाढीमुळे वाहतूककोंडीचा प्रश्न अधिक जटिल झाला आहे.



चारचाकी वाहने, मोठ्या खासगी प्रवासी गाड्या, चारचाकी, मालवाहतूक करणाऱ्या गाड्यांमुळे दुचाकी वाहन चालवणाऱ्या सर्वसामान्य वाहन चालकांना वाहन चालवताना कसरत करावी लागते आहे. अनेकदा वाहतूक कोंडीत अडकून ऐन थंडीतही गर्दीमुळे घाम फुटत आहे.

पुणे-नगर हा राष्ट्रीय महामार्ग आहे. परिसरात असलेल्या उद्योग क्षेत्रामुळे वाघोली परिसरातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. लोकसंख्येसोबतच वाहनांच्या संख्येतदेखील मोठी वाढ झाली आहे. महामार्ग असल्यामुळे राज्यासह परराज्यात जाणाऱ्या वाहनांची वर्दळ नेहमीच वाघोली गावात असते.

असे असले तरी वाघोलीमधील रस्ते अरुंद आहेत. निरनिराळ्या व्यावसायिकांनी रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे छोट्या रस्त्यावर वाढलेल्या वाहनसंख्येमुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर होत असते.

वाघोलीचा पालिकेत समावेशाबरोबरच लोणी कंद पोलीस स्टेशनचा समावेश शहर पोलिस आयुक्त कार्यालयात झाला. शहर पोलीसांकडे वाहतूक व्यवस्थापन गेल्यामुळे आता तरी वाघोलीचा वाहतुकीचा असलेला प्रश्न मार्गी लागेल असे वाटत होते. परंतु वाघोलीकरांचे स्वप्न सध्याच्या वाहतूक कोंडीमुळे भंग झाले आहे. पालिकेच्या माध्यमातून झाल्यावर रस्त्यावरील अतिक्रमणे हटवण्यात येणे अपेक्षित होते. त्यामुळे रस्ता अधिक रुंद झाला असता. परंतु परिस्थितीमध्ये काडीचाही फरक न पडल्यामुळे वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

अनेकदा दुचाकी चालक नियमांची पायमल्ली करतात. त्यांच्या बेजबाबदार वाहन चालवण्यामुळे वाहतूक कोंडीत अधिकची भर पडतच असते. या अनेक कारणांमुळे वाघोलीत सदासर्वदा दिवसाचे चोवीस तास गर्दी आणि रस्त्यावर वर्दळ पाहायला मिळते. नेहमीच्या वाहतूक कोंडीतून मार्ग काढता काढता वाघोलीकर आता हैराण झाले आहेत.

यावर उपाय म्हणून वाहतूक नियंत्रण कक्षाने दुचाकी वाहनांवर कारवाईची मोहीम हाती घेतली होती. पोलीसांच्या या कारवाईमुळे दुचाकीस्वारांनी धास्ती घेत रस्त्यावर वाहने लावणे बंद केले होते. दुचाकीची जागा चारचाकीने घेतल्यामुळे चारचाकी वाहन चालकांची अरेरावीदेखील दिवसेंदिवस वाढत चालली आहे. दुचाकी चालकांचा न्याय चारचाकी वाहनाचालकांदेखील लागू करण्यात यावा. चार चाकी वाहन रस्त्यावरच उभे करण्याच्या सवयीला त्याशिवाय जरब बसणार नाही. बेशिस्त वाहन चालक ही वाहतूक व्यवस्थापन करणाऱ्यांची डोकेदुखी ठरली आहे.

> बेशिस्त दुचाकीवर कारवाई करण्यासाठी टोईंग व्हॅन कायमस्वरूपी मिळाली आहे. परंतु चारचाकी वाहने लावून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर टोईंग क्रेन नसल्याने वाहतूक पोलिसांना कारवाई करण्यासाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे कायमस्वरूपी टोईंग क्रेन मिळावी यासाठी पाठपुरावा करणार आहे.
> **- राजेंद्र सातव पाटील, माजी उपसरपंच, वाघोली**

> चारचाकी वाहनांसाठी टोईंग क्रेन नसल्याने चारचाकी वाहनांवर कारवाई करणे अडचणीचे आहे. सध्या रहदारीस अडथळा ठरणाऱ्या चारचाकी वाहनांचे फोटो काढून दंड आकारणी केली जात आहे. टोईंग क्रेन मिळाल्यानंतर दुचाकी प्रमाणेच कारवाई केली जाईल.
> **- गजानन जाधव, वाघोली वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक**

> सद्य परिस्थिती काय आहे ही सांगण्याची गरज नसून वाहतूक पोलिसांनी लवकर क्रेनची सुविधा उपलब्ध करून चारचाकी वाहनावर कारवाई केल्यास वाघोलीकर निवांत श्वास घेऊ शकतील.
> **- करण थोरात, सामाजिक कार्यकर्ते**

# विजयानगर कॉलनीतील महापालिका-लक्ष्मीबाई चास्टे ट्रस्टचा वाद

## सदाशिव पेठेतील विजयानगर कॉलनी मधील 'ओपनस्पेस' ची जागा न्यायालयाच्या आदेशानुसार लक्ष्मीबाई चास्टवे चॅरिटेबल ट्रस्टने ताब्यात घेतली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सदाशिव पेठेतील विजयानगर कॉलनी मधील 'ओपनस्पेस' ची जागा न्यायालयाच्या आदेशानुसार लक्ष्मीबाई चास्टवे चॅरिटेबल ट्रस्टने ताब्यात घेतली आहे. दरम्यान, महापालिकेने या जागेचा ताबा दिला नाही असा दावा केला आहे.




सदाशिव पेठेतील विजयानगर कॉलनी मधील 'ओपनस्पेस' ची जागा न्यायालयाच्या आदेशानुसार लक्ष्मीबाई चास्टवे चॅरिटेबल ट्रस्टने ताब्यात घेतली आहे. दरम्यान, महापालिकेने या जागेचा ताबा दिला नाही असा दावा केला आहे. ही जागा परत मिळविण्यासाठी आता महापालिकेच्या विधी विभागाला धावपळ करावी लागणार आहे. शहराच्या मध्यभागी असलेल्या विजयानगर कॉलनी येथील सुमारे ६ हजार ५४.३१ चौरसमीटर एवढी जागा ओपन स्पेस म्हणून दर्शविली गेली आहे.

सन १९८८ साली महापालिकेने या जागेचा गैरवापर होत आहे, या ठिकाणी कचरा टाकला जात असल्याने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीप्रमाणे जागा मालकास नोटीस पाठविली होती. तसेच केवळ एक रुपयाच्या नाममात्र मोबदल्यात ही जागा महापालिकेने ताब्यात घेतली. त्याविरुद्ध ट्रस्टने कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयात दाद मागितली होती. या दाव्याचा १९९९ साली निकाल लागला. सदर निकालानुसार जागेचा ताबा घेण्यापासून महापालिकेला मनाई केली होती. सदर जागा ताबा घेताना आवश्यक प्रक्रिया पार पाडली गेली नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले होते.

या नंतर महापालिकेने २००० साली पुन्हा जागा ताब्यात घेण्याची प्रक्रीया सुरु केली. दरम्यान, ट्रस्टने २०२० साली न्यायालयात दरखास्त दाखल करून २००७ च्या न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. यासंदर्भात महापालिकेला नोटीस मिळाली नाही असा दावा विधी विभागाकडून केला जात आहे. या दरखास्तीनुसार १९ नोव्हेंबर रोजी सदर जागेचा ताबा हा न्यायालयाच्या आदेशानुसार ट्रस्टला दिला गेला.

> दर ताब्याच्या कागदपत्रावर महापालिकेच्यावतीने कोणी सह्या केल्या नाहीत. तसेच न्यायालयाकडे महापालिकेच्या विधी विभागाने अर्ज दाखल केले आहे. यामध्ये दरखास्तीवर अंमलबजावणी करण्यापूर्वी न्यायालय कोणत्या गोष्टींचा विचार करू शकते याची माहीती दिली आहे. त्याचप्रमाणे महापालिकेने ताबा देण्यास विरोध केला आहे, या हरकतीचा विचार करावा असे अर्जात नमूद केले आहे. या निर्णयाविरुद्ध अपिल करण्यासंदर्भात विधी विभागाकडून विचार केला जात आहे..
> **- राजेंद्र सातव पाटील, माजी उपसरपंच, वाघोली**

> सदर जागेचा ताबा १९६७ पासून आमच्याकडे आहे. महापालिकेने जाहीर प्रकटन देऊन जागा ताब्यात घेण्याची प्रक्रीया बेकायदेशीर जागेचा कोणताही गैरवापर होत नाही, त्यासंदर्भात कोणताही पुरावा सादर नाही.
> **- लक्ष्मीबाई चास्टे ट्रस्ट**